**झोका ------- आठवणींचा !!**

आठवणींच्या हिंदोळ्यावर,
कधीतरी झुलते तीच पहाट,
स्पर्श ओलता, तव ओठांचा,
अन, धुक्यात गुरफटलेली वाट.

ऊब जाळते, तव मिठीतली,
श्वासांना पडते श्वासांची गाठ,
चावट होवून नजर गिरविते,
तव देहाचे, मादक घाट.

कळत, नकळत गुंतत जातो,
तव केसांची महिरप दाट,
मग धुंदफुंद, बेताल धडकते,
मम ह्रदयातील चौपाट.

असाच येतो कधीतरी झोका,
अन येते, आठवणींची लाट,
क्षण भर जगतो, अन मोहरतो,
परी जाणितो, भिन्न अपुली वाट.

**- डॉ. विनोद अडबे**